# असत्यमेव जयते?

## भारताच्या इतिहासातील दिशाभूल

लेखक: अभिजित जोग

### <u>सारांश</u>

भारत हा जगाच्या पाठीवरील बहुदा एकमेव देश असेल ज्याचा प्राचीन, वैभवशाली इतिहास नेहमीच मोडतोड करुन, मोठ्या प्रमाणात दिशाभूल करुन सादर करण्यात आला आहे. वेगवेगळ्या कालखंडात, वेगवेगळ्या शक्तींनी, वेगवेगळ्या कारणांसाठी हे केलं असलं तरी त्यांचे स्वार्थ एकमेकांशी जुळत असल्यामुळे गेली १५०-२०० वर्ष ही दिशाभूल अविरत सुरुच आहे. संपूर्ण असत्य आणि काल्पनिक गोष्टी कुठलाही पुरावा नसताना 'इतिहास' म्हणून प्रस्थापित करण्यात आल्या आहेत, तसंच शेकडो पुरावे असलेल्या घटना, 'घडल्याच नाहीत' म्हणून बेदरकारपणे नाकारण्यात आल्या आहेत. इतकंच नव्हे, तर या खोटेपणाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या आणि खरा इतिहास सांगू पहाणाऱ्यांना 'प्रतिगामी', 'धर्मांध' ठरवून वैचारिक क्षेत्राच्या परीघावर ढकलून देण्यात आलं आहे आणि त्यांचं प्रतिपादन जगासमोर येणारच नाही अशा रितीने दडपून टाकण्यात आलं आहे.

गेल्या काही वर्षात, काही विद्वान संशोधकांनी या वैचारिक दडपशाहीविरुद्ध हार न मानता भारताचा खरा इतिहास सप्रमाण जगासमोर आणणारं मौलिक संशोधन केलं आहे. आजवर भारताच्या इतिहासाबद्दल करण्यात आलेली दिशाभूल देशासाठी फारच हानीकारक ठरली आहे. कारण यामुळे भारतीयांच्या कित्येक पिढ्या न्यूनगंड आणि पराभूत मनोवृत्तीचा बळी ठरल्या आहेत. म्हणूनच या संशोधनाचं मूल्य अपार आहे.

वैदिक काळापासून स्वातंत्र्ययुद्धापर्यंत इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर झालेली दिशाभूल मराठी वाचकांसमोर यावी यासाठी हे पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या कालखंडांनुसार यात आठ प्रकरणांचा समावेश आहे.

**१) आर्यांच्या आक्रमणाचा सिद्धांत -**

ब्रिटिश लोक भारतात येऊ लागले तसं संस्कृत आणि ग्रीक, लॅटिन व इतर युरोपियन भाष्यांमधलं साम्य त्यांच्या लक्षात येऊ लागलं. याचा अन्वयार्थ इंग्लंड आणि युरोपच्या सोयीने लावण्यासाठी त्यांनी Aryan Invasion/Migration Theory चं प्रतिपादन केलं. एकोणिसाव्या शतकापासून आजपर्यंत या सिद्धांताचा एकही पुरावा ते देऊ शकलेले नाहीत. याउलट, संस्कृतचा जन्म भारतातच झाल्याचे व भाषा आणि संस्कृतीचा प्रवाह भारतातून पश्चिमेकडे गेल्याचे असंख्य पुरावे उपलब्ध आहेत. या प्रकरणात पुरातत्वशास्त्र (सिंधू-सरस्वती संस्कृतीच्या उत्खननात आढळलेले पुरावे), जलविज्ञान (सरस्वती नदीच्या अस्तित्वाचे पुरावे), ऋग्वेदात आढळणारे पुरावे, अनुवांशिक शास्त्र (जेनेटिक्समधील संशोधनात आढळलेले पुरावे) अशा विविध गोष्टींचा उहापोह करुन Aryan Invasion/Migration Theory बाबत झालेली दिशाभूल दाखवून देण्यात आली आहे.

## २) पराभूत आहे जगती पुत्र भारताचा?

आठव्या शतकातील महंमद बिन कासिमपासून अठराव्या शतकातील अहमदशहा अब्दालीपर्यंत भारताचा इतिहास हा पराभवांचा इतिहास आहे असं सांगितलं जातं. ही एक मोठी दिशाभूल आहे.

६३२ साली महंमद पैगंबरांचा मृत्यू झाल्यानंतर अरब / मुस्लिम आक्रमकांनी पूर्वेकडे मध्य आशियापासून पश्चिमेकडे स्पेनपर्यंतचा विस्तीर्ण भूप्रदेश, अवघ्या शंभर वर्षात जिंकून घेतला. बायझंटाईन साम्राज्य, पर्शियन साम्राज्य यासारखी शक्तिशाली साम्राज्य या झंझावातासमोर पाल्यापाचोळ्यासारखी उडून गेली. त्यानंतर अवघ्या दोनशे वर्षात या संपूर्ण भूप्रदेशात त्यांनी अरेबिक भाषा आणि मुस्लिम धर्माचा एकछत्री अंमल बसवला. भारतात मात्र १०००-१२०० वर्षांनंतरही त्यांना संपूर्ण भारत जिंकून घेता आला नाही किंवा भारतीय भाषा आणि हिंदू धर्म यांचं संपूर्ण उच्चाटनही करता आलं नाही. कारण या कालखंडाचा इतिहास हा पराभवांचा नव्हे तर संघर्षाचा इतिहास आहे.

या प्रकरणात हा संपूर्ण संघर्षमय कालखंड टप्प्या-टप्प्याने, विविध उदाहरणं देत उलगडत गेला आहे.

## ३) नकार विकृती... जे सोयीचं नाही ते, घडलंच नाही!

दुसऱ्या महायुद्धादरम्यान, नाझींनी केलेलं ज्यूंचं हत्याकांड (होलोकॉस्ट) झालंच नाही असं म्हणणारे जर्मनी व युरोपमध्ये काही लोक आहेत. या प्रकृतीला निगेशनिझम (नकारविकृती) असं म्हटलं जातं. पण हे लोक संख्येने अगदी मूठभर असून त्यांचं म्हणणं कोणी गांभीर्याने घेत नाही. जर्मनीसारख्या अनेक देशात होलोकॉस्ट घडल्याचं नाकारणं हा कायद्यानं गुन्हा आहे.

याउलट, भारताच्या इतिहासात अरब व तुर्की आक्रमकांनी केलेला मंदिराचा विध्वंस आणि जबरीने केलेलं धर्मांतर 'झालंच नाही' हे प्रतिपादन अधिकृत इतिहासाचा भाग बनलं आहे. याविरुद्ध बोलणं म्हणजे सेक्युलॅरिझमला विरोध आणि धर्मांधपणा असं मालं गेलं आहे. जवाहरलाल नेहरुंची, कॉंग्रेस गोटातल्या बुद्धिवंतांची लॉबी; मुस्लिम विद्वान आणि डावे इतिहासकार हे या नकारविकृतीचे पाईक आहेत. त्यांच्या याविषयीच्या प्रतिपादनाचं विश्लेषण आणि सप्रमाण खंडन हा या प्रकरणाचा विषय आहे.

## ४) सम्राट अशोक आणि बादशाह अकबर... खरेच द ग्रेट?

जवाहरलाल नेहरुंचं राजकारण आणि प्रतिमानिर्मिती यांचे, शांतता / अहिंसा आणि सर्वधर्मसमभाव हे दोन प्रमुख पैलू. त्यांची प्रतीकं म्हणून अशोक आणि अकबर यांना निवडून, अधिकृत इतिहासात त्यांचा मोठा गवगवा करण्यात आला. त्यांच्या तुलनेत इतर अनेक महापराक्रमी, मोठी साम्राज्य निर्माण करणाऱ्या आणि आदर्श राज्यकारभार करणाऱ्या राजांना अनुल्लेखाने मारण्यात आलं किंवा किरकोळ उल्लेखावर भागविण्यात आलं. इतिहास हे सांगतो की अशोकाची अहिंसा आणि अकबराचा सर्वधर्मसमभाव ही त्यांची जीवनमूल्य नाही, तर राजकीय सोय होती. हे वास्तव या प्रकरणात सप्रमाण मांडलं आहे.

## ५) सूफी... यू टू?

इतिहासात असा समज करून देण्यात आला आहे, की सूफी संत हे महान मानवतावादी होते आणि त्यांनी भारतातील हिंदू व मुसलमानांदरम्यान सामंजस्याचे आणि प्रेमाचे पूल बांधले. हे पूर्णपणे चुकीचं आहे. भारतातले सगळे प्रख्यात सूफी संत इस्लामी आक्रमकांबरोबर भारतात आले आणि इस्लामी जिहादला त्यांचा संपूर्ण पाठिंबा आणि सक्रिय सहभाग होता. अनेकदा तर अत्यंत जुलमी आक्रमकांना मृत्यूनंतर सूफी संत घोषित करण्यात आलं आणि त्यांच्या कबरी बघता बघता तीर्थयात्रेची ठिकाणं बनल्या. या प्रकरणात सूफी पंथाच्या उदयाचा इतिहास, त्यांचं भारतातलं आगमन आणि येथे मूर्तिपूजकांबद्दल पुरेशी कठोर भूमिका न घेतल्यास मुस्लिम राज्यकर्त्यांवर त्यांनी टाकलेला दबाव आणि स्वतः केलेले जुलूम, अत्याचार यांची योग्य संदर्भासहित उदाहरणं देऊन या विषयातली दिशाभूल स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ६) भारताचं सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक मागासलेपण, कारणं आणि लादणं!

ब्रिटिशांनी भारत जिंकून घेतला तेव्हा हिंदू समाज किती रूढीग्रस्त आणि मागासलेला होता याचं अतिरेकी वर्णन केलं गेलं आहे. सती, बालविवाह, विधवांचं केशवपन यासारख्या प्रथा अत्यंत जुनाट, निषेधार्ह आणि त्याज्य होत्या हे निर्विवाद असलं, तरी त्यांचं प्रमाण प्रत्यक्षात होतं त्यापेक्षा अनेक पटींनी वाढवून दाखविण्यात आलं. हिंदू समाज जणू नैतिक अधःपतनाच्या गर्तेत खोलवर रुतलेला असून त्याला त्यातून बाहेर काढण्याचं काम ब्रिटिशांनीच केलं पाहिजं असं चित्र निर्माण करण्यात आलं. उदाहरणार्थ, ब्रिटिश सरकारने केलेल्या सर्वेक्षणानुसार दहा वर्षात संपूर्ण भारतात ४००० स्त्रिया सती गेल्या होत्या. ब्रिटिश मिशनऱ्यांनी मात्र ही संख्या वर्षाला ५०००० असल्याचा प्रचार इंग्लंडमध्ये केला. यामागे एक वेगळाच अंतस्थ हेतू होता. इस्ट इंडिया कंपनीला फक्त व्यापारात रस होता. धर्मप्रचाराच्या कार्यामुळे स्थानिक जनता आपल्या विरोधात जाईल या भीतीने त्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात येण्यावर बंदी घातली होती. या बंदीविरुद्ध इंग्लंडमधील जनमताचा रेटा निर्माण करण्यासाठी मिशनऱ्यांनी हिंदू समाज कसा रसातळाला गेला आहे व गरीब बिचाऱ्या सामान्य लोकांना वाचविण्याची जबाबदारी ख्रिश्चन धर्माने घेणं कसं गरजेचं आहे असा प्रचार सुरु केला. या प्रचाराला यश मिळून १८१३ साली मिशनऱ्यांना भारतात धर्मप्रसाराचं कार्य करण्याची परवानगी मिळाली. या आजवर अज्ञात ठेवल्या गेलेल्या इतिहासाची साधार मांडणी या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ७) चरखा चालवून सूत नक्की मिळतं, पण स्वातंत्र्य?

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली, शांततापूर्ण, अहिंसक मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळालं हा आपल्या इतिहासातला एक आवडता सिद्धांत आहे.

पण गेल्या काही वर्षात उघडकीला आलेले संदर्भ आणि पुरावे यांच्यावरुन असं लक्षात येत आहे की इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य द्यायचा निर्णय घेतला, त्यामागे काँग्रेसच्या अहिंसक चळवळी हे फारसं महत्वाचं कारण नव्हतं. ब्रिटिश या निणर्यापर्यंत पोचले, ते मुख्यतः आझाद हिंद फौजेच्या प्रेरणेने भारतीय सैन्यात बंडाळ्या सुरु झाल्या, त्यामुळे. ब्रिटिशांचं भारतातील साम्राज्य हे भारतीय सैनिकांच्या बळावर उभं होतं. त्यांची निष्ठाच डळमळीत होऊ लागली, हे दिसल्यावर मूठभर ब्रिटिश सैनिकांच्या जिवावर भारतात राज्य करणं शक्य नाही. हे ब्रिटिशांना कळून चुकलं आणि त्यांनी भारताला स्वतंत्र करण्याचा निर्णय घेतला.

हा सगळा घटनाक्रम विविध पुरावे व संदर्भासहित या प्रकरणात मांडला आहे.

## ८) आता ही चर्चा कशाला?

आजवर कोणी लबाडीने, तर कोणी सद्हेतूने भारताच्या इतिहासातलं सत्य लपविण्याचा प्रयत्न केला. पण सत्य लपवून काहीच साध्य होत नाही. त्यापेक्षा देशाच्या जनतेला आणि जगाला खरं काय ते सांगून, देशाचं सामाजिक स्थैर्य आणि ऐक्य बिघडू न देता पुढे कसं जाता येईल याचा उहापोह या प्रकरणात केला आहे.

मी इतिहास संशोधक नाही. शाळेपलीकडे इतिहास हा विषय कधी शिकलेलोही नाही. पण विद्धान संशोधकांच्या ग्रथांचा अभ्यास करून मला उलगडलेलं तथ्य एका सूत्रात गुंफून जिज्ञासू वाचकांसमोर मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. यात उधृत केलेल्या प्रत्येक घटनेला इतिहासकारांच्या संशोधनाचा संदर्भ उपलब्ध आहे. त्यांचे विश्लेषण मी माझ्या परीने करण्याचा प्रयत्न केला आहे. कुठलाही घटनाक्रम मांडताना त्यामागच्या विस्तृत संदर्भाचा पट उलगडून त्याच्या पार्श्वभूमीवर त्या घटनांचं आकलन व्हावं असा प्रयत्न केला आहे. भारताच्या इतिहासाचं पावलोपावली झालेलं विकृतीकरण आणि दिशाभूल याचं मळभ दूर करून खऱ्या इतिहासाचं दर्शन जिज्ञासूंना व्हावं असा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे. भारतावर आणि इतिहासावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला तो आवडेल असा मला विश्वास आहे.